**विशेष लेख :**

७ फाल्गुन १९२४ (सायं. ५.३० वा.)
बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २००३

## पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासन सज्ज

पिण्याचे पाणी ही मूलभूत गरज आहे. खेडयापाडयापासून ते शहरी भागातील जनतेला मिळणा-या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. परंतु राज्यात सततच्या अवर्षणामुळे जमिनीवरील तसेच भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसें-दिवस कमी होत आहे. त्यामुळे शेती, उद्योग यांना देखील मोठया प्रमाणात टंचाई भासू लागली आहे.

चालू वर्षी महाराष्ट्रात सरासरी पर्जन्यमान कमी झाल्यामुळे उन्हाळयात पाण्याची टंचाई भासणार आहे. त्यामुळे आतापासूनच महसूल यंत्रणा, जिल्हा परिषद व परिसर अंभियांत्रिकी विभाग, भूजल सर्वेक्षण यंत्रणा याच्या माध्यमातून पाणी टंचाई निवारणासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

**पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाण्याचा आढावा ऑक्टोबर महिन्यापासून घेण्यात येतो. दररोज माणसी २० लिटर पाणी आवश्यक असते. त्यापेक्षा कमी पाणी असणा-या खेडया-पाडयांना व गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो. गेल्यावर्षी राज्यात एकूण १६८ पिण्याच्या पाण्याचे टँकर देण्यात आले होते. परंतु यावर्षी ५६८ गावे आणि १०८९ वाडयांना पाण्याची कमतरता भासत आहे. त्यासाठी ५०४ टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. गत वर्षी पेक्षा या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे.**

### टँकरने पाणी पुरवठा

राज्यात यावर्षी सर्वात जास्त टँकर सांगली जिल्हयात आहेत. सध्या तेथे ९४ टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. सोलापूर ९२, पुणे ६९, औरंगाबाद ५३, अहमदनगर ८८, उस्मानाबाद ४८, बीड ११,लातूर ११, रायगड ३१, यवतमाळ ४, तर ठाणे जिल्हयात दोन ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. विदर्भात ब-यापैकी पाऊस झाल्याने या विभागातील यवतमाळ वगळता इतरत्र पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता भासत नाही. सर्वात तीव्र पाणी टंचाई पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयातील काही जिल्हयांना जाणवत आहे.

टंचाईग्रस्त गावात पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असेल तेथे टँकर देण्याचे अधिकार तहसिलदारांना देण्यात आले आहेत. टंचाई गावांची प्रत्यक्ष पहाणी करुन तेथे पाण्याचे टँकर पुरविले जातात.

पिण्याच्या पाण्याशी मुकाबला करण्यासाठी राज्य शासनाने शिवकालीन पाणी पुरवठा योजनेवर गेल्या वर्षी २४ कोटी रुपये खर्च केले आहेत. ही योजना मोठया प्रमाणात राबविण्यात येणार आहे. या वर्षी सुमारे १६८ कोटी रुपये पिण्याच्या पाण्यासाठी खर्च अपेक्षित आहे. हाच खर्च गत वर्षी १२३ कोटी रुपये इतका करण्यात आला होता. सध्याची राज्यातील पाण्याची परिस्थिती लक्षात घेता उन्हाळयामध्ये टँकरची संख्या दोन हजारावर जाण्याची शक्यता आहे. सध्या पुणे, सातारा, सांगली जिल्हयाच्या पूर्व भागाबरोबर बीड, लातूर, सोलापूर, अहमदनगर जिल्हयातही दुष्काळाची परिस्थिती आहे. या टंचाईला तोंड देण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे १००० कोटींची मागणी केली आहे.

**-- कविता मुकणे**

-------